महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्रमांकः कअनि -१११८ /प्र.क्र. ०१/१४-ब
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: ०२ एप्रिल, २०१८.

<u>वाचा</u>:- १) सा.प्र.वि., शासन आदेश क्रमांक कअनि-१११७/प्र.क्र.१०/१४-ब, दि.३१.०५.२०१७
२) अल्प.वि.वि., शासन आदेश शिस्तभं-२०१७/प्र.क्र.९७/फा-१, दि.२२.०६.२०१७
व आदेश क्र. शिस्तभं-४८१७/प्र.क्र.९७/का-१, दि.२३.०३.२०१८

शासन आदेश

संदर्भाधीन आदेश क्रमांक (१) अन्वये श्री. श.र.साळुंखे, क.अ. अल्पसंख्याक विकास विभाग यांची नियम ४(५) अन्वये उद्योग, ऊर्जा व कामगार विभागामध्ये बदली करण्यात आली होती. तथापि, अल्पसंख्याक विकास विभागामध्ये श्री. श.र.साळुंखे, क.अ. यांच्या विरुध्द निलंबनाची कार्यवाही चालू असल्यामुळे त्यांना अल्पसंख्याक विकास विभागामधून कार्यमुक्त केले नव्हते. श्री. साळुंखे, क.अ. यांना संदर्भाधीन क्रमांक (२) येथील दिनांक २२.०६.२०१७ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले होते. आता, अल्पसंख्याक विकास विभागाने दिनांक २३.०३.२०१८ च्या आदेशान्वये श्री. श.र.साळुंखे, कक्ष अधिकारी, (निलंबित) यानां विभागीय चौकशीच्या अधीन राहून त्यांना कोणत्याही प्रकारचे वित्तीय अधिकार प्रदान न करता / वित्तीय बाबी हाताळण्यास मनाई राहील. या अटीच्या अधीन राहून त्यांना शासकीय सेवेत पुर्नस्थापित केले आहे. तसेच, त्यांची अकार्यकारी पदावर पदस्थापना करण्यात येत आहे असे आदेशित करुन, त्यांच्या सेवा सामान्य प्रशासन विभागाकडे प्रत्यार्पित केल्या आहेत.

२. श्री. श.र.साळुंखे, कक्ष अधिकारी, यांची बदली यापूर्वीच अल्पसंख्याक विकास विभागातून संदर्भाधीन आदेश क्रमांक (१) अन्वये उद्योग, ऊर्जा व कामगार विभागामध्ये करण्यात आली आहे. सबब अल्पसंख्याक विकास विभागाच्या दिनांक २३.०३.२०१८ रोजीच्या आदेशातील अटींच्या अधीनतेने श्री. श.र. साळुंखे, कक्ष अधिकारी यांनी बदलीच्या विभागामध्ये रूजू व्हावे.

३. श्री. श.र.साळुंखे, कक्ष अधिकारी यांचा दिनांक २३.०३.२०१८ ते या आदेशाच्या दिनांकापर्यंतचा सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करण्यास सामान्य प्रशासन विभागाची याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करण्याची कार्यवाही म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ च्या नियम ९(१४) (एफ) नुसार, व शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ०२.०६.२००३ मधील तरतुदीनुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने करावी.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०२१६२५१६६७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2018.04.02 16:29:24 +05'30'

(ग.भि. गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री. श.र.साळुंके, कक्ष अधिकारी

प्रत,

१. अ.मु.स./प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग/ उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय मुंबई - ४०० ०३२. (संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)

२. सह / उप सचिव (आस्थापना), अल्पसंख्याक विकास विभाग/ उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,

३. उपसचिव (कार्यासन-११), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,

४. निवडनस्ती.